‖ वर्ष - 8 ।अंक - 61 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

केसरबाप्पा!

www.mahaenews.com ‖ शनिवार, दिनांक 07 सप्टेंबर 2024 ‖ पुणे आवृत्ती ‖ mahaenews.com ‖ maha_enews ‖ Mahaenews

## पुणे पोलिस गिरवणार योगी आदित्यनाथांचा कित्ता

# आता पुण्यातही योगी पॅटर्न!

### ज्या गुन्हेगारांनी अतिक्रमण करून घरे बांधलीत त्यांची पुणे पोलिस माहिती संकलित करणार

। पुणे । महाईन्यूज

**पुण्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्या खून प्रकरणी आतापर्यंत 15 जणांना अटक केली असून, काही संशयीत आरोपींचा पुणे पोलिस शोध घेत आहेत. आंदेकरांच्या खुनानंतर पुण्यातील सराईत गुन्हेगारांच्या मालमत्तेची माहिती पोलिस घेत आहेत. ज्या गुन्हेगारांनी अतिक्रमण करुन घरे बांधली आहे, अशा घरांवर पोलिस लवकरच कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहेत. याबाबत माहिती संकलित करण्यास पुणे पोलिसांनी सुरुवात केली आहे.**



उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ काही महिन्यापासून बुलडोझर कारवाईमुळे चर्चेत आहेत. मोठ्या गुह्यातील आरोपींच्या अनधिकृत घरांवर बुलडोझर फिरवण्यात आल्याचं उत्तर प्रदेशातून समोर आलं होतं. तोच कित्ता आता पुणे पोलिस गिरवणार आहेत.पोलिस आयुक्त अमितेश कुमार हे उत्तरप्रदेशातील 'योगी पर्टन'पुण्यात राबवणार आहेत.

पुण्यातील गुन्हेगारांच्या टोळ्या संपवण्यासाठी पोलिसांनी कंबर कसली आहे. वनराज यांच्या खुनात सहभागी असलेल्या प्रमुख आरोपींचे गुन्हेगारी रेकॉर्ड आहे. त्यांना अद्दल घडविण्यासाठी त्यांच्या बेकायदा घरावर बुलडोझर फिरविण्याची तयारी पोलिसांनी केली आहे.

### आता बुलडोझर चालविला जाणार

"ज्या गुन्हेगारांनी आपली घरे बेकायदा पद्धतीने बांधली आहेत, त्यांच्यावर आता बुलडोझर चालविला जाणार आहे. याबाबत माहिती संकलित केली जात आहे. नियमांच्या चौकटीत राहून ही कारवाई केली जाणार आहे. "तुम्ही बदमाश असाल तर पोलिसदेखील शरीफ नाहीत, हे आम्ही दाखवून देऊ," असा दम अमितेश कुमार यांनी गुन्हेगारांना भरला आहे.अमितेश कुमार म्हणाले, "वनराज यांचा खून केल्यानंतर, किंवा खुनाच्या पूर्वी प्रमुख आरोपींच्या संपर्कात असलेल्या व्यक्ती पोलिसांच्या रडारवर आहेत. आरोपींना पैसे पुरवणे त्यांना पळून जाण्यास मदत केल्याचा पोलिसांना संशय आहे. त्यांना या गुन्ह्यात आरोपी केले जाणार आहे,"

---

## लोकसभेत भाजपला जबरदस्त फटका, डॅमेज कंट्रोलसाठी गडकरींकडे धुरा!

### लोकसभेतील फटका भरून काढण्यासाठी भाजपचा नवा प्लॅन

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

लोकसभा निवडणुकीत भाजपला जबरदस्त फटका बसला. बड्या नेत्यांच्या सभा, दौरे आणि बुथ पातळीवरील व्यवस्थापनाचा लाभ झाला नाही. महाआघाडी आणि महायुतीत मतांच्या टक्केवारीत विशेष फरक नाही. हे अंतर भरून काढण्याचे नियोजन भाजपने केले आहे. त्यासाठी तब्बल दशकभरानंतर गडकरी हे राज्यात सक्रिय होतील. नितीन गडकरी यांनी गेल्या काही



वर्षांत नागपूर, विदर्भ महाराष्ट्रच नव्हे; तर, संपूर्ण देशभरात विकासात मोठे योगदान दिले. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी देखील त्यांच्या कामाचे कौतुक केले. त्यामुळे लोकांमध्ये त्यांच्याबद्दल विश्वास व्यक्त केला जात आहे. तथापि, दशकभरापासून त्यांनी राज्यातील राजकारणापासून स्वत:ला अलिप्त ठेवले. कुठल्याही वादावर किंवा घडामोडींवर त्यांनी मत व्यक्त केले नाही. उलट विकासकामांसाठी त्यांनी सर्वपक्षीय नेत्यांच्या बैठका घेतल्या. करोनाच्या संकट काळात त्यांनी राज्यात लक्ष केंद्रित केले होते. विदर्भातील सर्व पालकमंत्र्यांची बैठक घेतली होती. मात्र, राजकारणापासून ते दूर राहिले. भूपेंद्र यादव प्रभारी, तर अश्विनी वैष्णव सहप्रभारी असले तरी, यावेळी गडकरी यांच्या लोकप्रियतेचा फायदा राज्यात घेण्याचे भाजपचे प्रयत्न आहेत.

### गडकरींच्या लोकप्रियतेचा भाजप फायदा घेणार

याबाबत बोलताना प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, पक्षाने केलेली विनंती नितीन गडकरी यांनी मान्य केली. राज्यातील ते बडे नेते आहेत. कोअर व संसदीय समितीचे ते सदस्य आहेत. संपूर्ण राज्य त्यांच्यावर प्रेम करते. लोकसभा निवडणुकीत त्यांनी राज्यात पंधरवडा दिला, विधानसभेसाठी एक महिना देतील.

### भाजपसाठी मोठे आव्हान

राज्यात भाजपसमोर मोठे आव्हान आहे. त्यासाठी सर्वांना चालणारा आणि विकासाभिमुख चेहरा म्हणून नितीन गडकरी यांचे नाव समोर आले. प्रचारच नव्हे तर निवडणूक प्रक्रियेत त्यांची भूमिका महत्त्वाची राहील. उमेदवार निश्चित करण्यातदेखील त्यांचा सहभाग राहणार आहे.

# कंत्राटी शिक्षक निर्णयावर टीकेची झोड

## पात्रताधारकांची दरमहा 15 हजार वेतनावर कंत्राटी नियुक्ती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील २० किंवा त्यापेक्षा कमी पटसंख्येच्या शाळांमध्ये निवृत्त शिक्षक किंवा डीएड, बीएड पात्रताधारकांची दरमहा १५ हजार वेतनावर कंत्राटी नियुक्ती करण्याचा निर्णय वादात सापडला आहे.**



शिक्षण विभागाने शिक्षकांच्या अस्मितेला धक्का दिला असून, या निर्णयामुळे राज्यातील कमी पटसंख्येच्या शाळांचे नुकसानच होणार असल्याची टीका संघटना, पात्रताधारकांकडून करण्यात आली असून, शिक्षण विभागाने तातडीने निर्णय मागे न घेतल्यास राज्यभर आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.राज्यातील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. पवित्र प्रणालीमार्फत भरतीप्रक्रियेतून नियमित शिक्षक उपलब्ध होईपर्यंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी निवृत्त शिक्षकांच्या नियुक्तीचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला होता. त्यानंतर शिक्षण विभागाने शिक्षक दिनीच कंत्राटी शिक्षक नियुक्तीचा निर्णय जाहीर केला. त्यानुसार कमी पटसंख्येच्या सर्वच शाळांमध्ये निवृत्त शिक्षक उपलब्ध होतील असे नाही. त्यामुळे पद रिक्त राहून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. राज्यात डीएड, बीएड झालेले पात्रताधारक बेरोजगार उमेदवार मोठ्या प्रमाणात आहेत. त्यांना कमी पटसंख्येच्या शाळांवर संधी दिल्यास शिक्षकांची पदे रिक्त न राहता विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, असे निर्णयाद्वारे स्पष्ट करण्यात आले. राज्यभरातील तरुणांनी शिक्षक होण्यासाठी वर्षानुवर्षे अभ्यास करून पात्रता मिळवली आहे. राज्यात शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असताना कंत्राटी नियुक्ती करण्याचा शिक्षण विभागाचा निर्णय अत्यंत चुकीचा आहे. नियमित नियुक्ती होणाऱ्या उमेदवारांना १६ हजार रुपये वेतन मिळते आणि कंत्राटी शिक्षकांना १५ हजार रुपये वेतनाचे आमिष दाखवण्यात आले आहे. कंत्राटी शिक्षकांनी इतक्या कमी वेतनात नियमित शिक्षकाप्रमाणे सर्व कामे करणे ही पिळवणूक आहे. तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शाळांमध्ये नियमित शिक्षकच असले पाहिजेत. हजारो पात्रताधारक नियमित भरतीच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे शिक्षण विभागाने कंत्राटी शिक्षक नियुक्तीचा निर्णय तातडीने मागे घेण्याची मागणी पात्रताधारकांनी केली. तसेच या निर्णयाविरोधात आंदोलन करण्यात येणार असल्याचेही सांगितले. आप पालक युनियनचे मुकुंद किर्दत म्हणाले, की कमी पटसंख्येच्या शाळांमध्ये कंत्राटी शिक्षक आणि सेवानिवृत्त शिक्षक नियुक्तीचा निर्णय लाखो पात्रताधारकांसाठी अत्यंत उद्वेगजनक आहे. केवळ १५ हजार वेतनावर काम करायला लावून उमेदवारांचे आर्थिक शोषण केले जाईल. तसेच वयाच्या सत्तरीपर्यंत निवृत्त शिक्षकांना काम देऊन बेरोजगार तरुणांवर अन्याय केला जाणार आहे. छोट्या गाववस्तीतील कमी पटसंख्येच्या शाळांना दुर्लक्षित करून 'गरिबांना सुविधा पण गरीबच' असे धोरण सरकार अवलंबते आहे. निवृत्त आणि कंत्राटी शिक्षक पटसंख्या वाढवण्यासाठी काम करणार नाहीत. त्यांचे उत्तरदायित्व हे मर्यादित असेल. त्यामुळे महाराष्ट्रातील शैक्षणिक क्षेत्रासाठी हे अत्यंत धोकादायक धोरण आहेकमी पटसंख्येच्या नावाखाली नियमित शिक्षकालाच हद्दपार करायचे अशा प्रकारचा निर्णय शासनाने शिक्षक दिनीच घेतला. हा निर्णय शिक्षकांच्या अस्मितेलाच धक्का देणारा, कमी पटसंख्येच्या शाळांतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी मारक आहे.

### राज्यभर आंदोलनाचा इशारा

शिक्षण क्षेत्रातील जाणकार आणि लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून राज्यात आंदोलन करण्यात येणार आहे, असे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य अध्यक्ष विजय कोंबे यांनी सांगितले.शिक्षण विभागाने शिक्षकांच्या अस्मितेला धक्का दिला असून, या निर्णयामुळे राज्यातील कमी पटसंख्येच्या शाळांचे नुकसानच होणार असल्याची टीका संघटना, पात्रताधारकांकडून करण्यात आली असून, शिक्षण विभागाने तातडीने निर्णय मागे न घेतल्यास राज्यभर आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. राज्यातील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत.

# पुणेकरांसाठी आनंदवार्ता! वर्षभराच्या पाण्याची चिंता सोडा

## खडकवासलासह चारही धरणे 'फुल्ल'

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला, टेमघर, पानशेत आणि वरसगाव या प्रकल्पांतील चारही धरणांच्या परिसरात अधूनमधून पावसाने हजेरी लावली. त्यामुळे धरण प्रकल्पातील चारही धरणे 'फुल्ल' झाली आहेत. धरणे १०० टक्के भरल्याने धरणात २९.१५ अब्ज घनफूट (टीएमसी) साठा उपलब्ध झाला आहे. टेमघर वगळता तिन्ही धरणांमधून विसर्ग सुरू करण्यात आला आहे. यामुळे पुणेकरांच्या वर्षभर पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या पाण्याची चिंता मिटली आहे.**



पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला, टेमघर, पानशेत आणि वरसगाव या प्रकल्पांतील चारही धरणांच्या परिसरात अधूनमधून पावसाने हजेरी लावली. त्यामुळे धरण प्रकल्पातील चारही धरणे 'फुल्ल' झाली आहेत. यामुळे पुणेकरांच्या वर्षभर पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या पाण्याची चिंता मिटली आहे.

### खडकवासला प्रकल्प 'फुल्ल'

पावसाने ऑगस्ट महिन्यातील बॅटिंगनंतर काहीशी विश्रांती घेतली. २४ ऑगस्टनंतर पुन्हा पावसाने सुरुवात केली. त्यामुळे धरणातील पातळी वाढण्यास मदत झाली. काही दिवसांच्या विश्रांतीनंतर सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात गेल्या दोन दिवसांपासून धरण परिसरात पावसाने हजेरी लावण्यास सुरुवात केली. गुरुवारी दिवसभरात पानशेत धरणात १४ मिलिमीटर, वरसगावमध्ये १३ मिमी आणि टेमघर धरणात १७ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. कालपर्यंत टेमघर आणि वरसगाव ही धरणे १०० टक्के भरली होती. मात्र, दोन दिवसांत धरण परिसरात झालेल्या पावसामुळे गुरुवारी खडकवासला, वरसगाव, पानशेत आणि टेमघर ही चारही धरणे 'फुल्ल' झाली आहेत. त्यामुळे पुण्याच्या पाण्याची; तसेच शेतीच्या पाण्याची चिंता मिटली. गेल्या वर्षी याच दिवशी २७.४२ टीएमसी म्हणजेच ९४.०७ टक्के पाणीसाठा उपलब्ध होता. धरणे 'फुल्ल' झाल्याने धरणातून विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

### 27 टीएमसी पाणी विसर्ग

खडकवासला प्रकल्पातील दोन धरणे भरल्याने दोन दिवसांपूर्वी किरकोळ स्वरूपात सुरू असलेला विसर्ग बंद केला होता. आता पुन्हा गुरुवारी सायंकाळी धरणे 'फुल्ल' झाल्याने टेमघर वगळता अन्य धरणांमधून विसर्ग सुरू करण्यात आला आहे. गुरुवारी सायंकाळी ७.३० वाजेपर्यंत १६ हजार १५९ क्युसेकने खडकवासल्यातून, पानशेतमधून चार हजार २१४ क्युसेक आणि वरसगावमधून चार हजार ३२० क्युसेकने विसर्ग सुरू करण्यात आला आहे. जून ते आतापर्यंत धरणातून २७.८० अब्ज घनफूट (टीएमसी) पाणी सोडण्यात आले आहे, अशी माहिती जलसंपदा विभागाने दिली.

### जिल्ह्यातील धरणेही 'फुल्ल'

पिंपरी-चिंचवडला पाणीपुरवठा करणारे पवना धरणही १०० टक्के भरले आहे. पुणे जिल्ह्यातील कळमोडी, चासकमान, भामा आसखेड, आंद्रा, वडिवळे, नाझरे, भाटघर, वीर विसापूर; तसेच उजनी धरणही शंभर टक्के भरले आहे. गुंजवणी, नीरा देवघर, डिंभे ही धरणे आता काठोकाठ भरण्याच्या मार्गावर आहेत. नीरा खोऱ्यातील धरणांत ९९.८१ टक्के पाणीसाठा जमा झाला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागाची पाण्याची; तसेच शेतीच्या पाण्याची चिंता मिटली आहे. मुळशीतील टाटाची मुळशी आणि ठोकरवाडी ही दोन धरणे 'फुल्ल' झाली आहेत.

## पिंपरी-चिंचवडची वाटचाल

# 'एज्युकेशन हब'च्या दिशेने!

### आ.महेश लांडगे यांचा विश्वास; पिंपरी-चिंचवडकरांशी सोशल मीडियातून संवाद

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्याचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महायुती सरकारच्या मदतीने आणि महानगरपालिका प्रशासनाच्या सकारात्मक सहकार्यामुळे गेल्या १० वर्षांमध्ये शहरातील शिक्षण क्षेत्रात विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लागले आहेत. त्यामुळे शहराची वाटचाल 'एज्युकेशन हब'च्या दिशेने सुरू आहे, असा विश्वास भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला.**




शहरातील शैक्षणिक उपक्रम आणि प्रकल्पांबाबत आमदार महेश लांडगे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून पिंपरी-चिंचवडकरांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी विविध मुद्यांवर भाष्य केले आहे.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, कामगारनगरी, उद्योगनगरी आणि ऑटो हब, आयटी हब... अशी दमदार वाटचाल करणारे आपले पिंपरी-चिंचवड शहर... देशाच्या कानाकोपऱ्यातून नोकरी, शिक्षण, रोजगार आणि व्यवसायाच्या निमित्ताने या शहरात नागरिक वास्तव्य करीत आहेत... म्हणूनच या शहराला 'मिनी इंडिया' म्हटले तर वावगे ठरणार नाही. आपल्या शहरातील विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी, वैद्यकीय, आधुनिक शिक्षणासाठी मुंबई, पुणे यासह राज्याबाहेरील संस्थांमध्ये प्रवेशासाठी पायपीट करावी लागते. त्यामुळे दर्जेदार शैक्षणिक सुविधा शहरात निर्माण व्हाव्यात, असा संकल्प आम्ही केला आहे.

शहरात भारतीय संत परंपरा, महाराष्ट्राचा गौरवशाली वारकरी सांप्रदायाचा वारसा जोपासला जावा...आधुनिक शिक्षणाशी स्पर्धा करतानाच अध्यात्माचाही प्रचार-प्रसार व्हावा या संकल्पनेतून आपण जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ आपल्या टाळगाव चिखली येथे सुरू झाले आहे. आजच्या घडीला या शैक्षणिक संकुलामध्ये १ हजार २०० हून अधिक विद्यार्थी वारकरी व आधुनिक शिक्षणाचे धडे गिरवत आहेत.... मला सांगायला अभिमान वाटतो की, हे भारतातील पहिले संतपीठ आहे. तसेच, राज्यातील नामांकित शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाची शाखा आपल्या मोशीमध्ये उभारली जात आहे. पिंपरी-चिंचवड मेडिकल कॉलेज व संशोधन सेंटर व पॅरामेडिकल कॉलेजसुद्धा सुरू होत आहे. विशेष म्हणजे, स्मार्ट सिटी योजनेच्या माध्यमातून शहरातील महानगरपालिकेच्या शाळा 'स्मार्ट स्कूल' संकल्पनेतून अध्ययावत करण्यात येत आहेत. तारांगण प्रकल्पामुळे विज्ञान क्षेत्रात मुलांची गोडी वाढती आहे, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

> शिक्षण क्षेत्रात केवळ नवीन प्रकल्पांना 'रेड कार्पेट' नव्हे, तर शैक्षणिक संस्थांना शहरात पोषक वातावरण निर्माण व्हावे. या करिता आम्ही पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यावर भर दिला. त्यामुळे "चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर" विकसित झाला. नागरीकरण आणि शैक्षणिक गरजा याचा विचार करुन गेल्या १० वर्षांमध्ये एकूण १० नवीन शाळा उभारण्याचे काम हाती घेतले. त्यापैकी कुदळवाडी, चिखली, जाधववाडी, बोऱ्हाडेवाडी, नेहरुनगर येथील शाळांचे काम पूर्ण झाले असून, डुडुळगाव, दिघी, भोसरी येथील शाळांचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच, खासगी शाळांच्या संख्या २०६ वर पोहोचली आहे. माझ्या विधानसभा क्षेत्रात खासगी व शासकीय असे तब्बल १ लाख २९ हजार ९६० इतके विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.
>
> **–महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा पिंपरी-चिंचवड.

#### संविधान भवनाचा अभिमान...

भारतीय लोकशाही... संविधान... राज्यघटना याचा प्रचार-प्रसार आणि जागृती व्हावी. यासह जगभरातील लोकशाही देशांमधील राज्यघटनांचा अभ्यास व्हावा. या करिता आपण भारतातील पहिले "संविधान भवन" उभारत आहोत. हा शहराच्या शैक्षणिक कामगिरीमधील मानाचा तुरा राहणार आहे आणि विशेष म्हणजे, सदर संविधान भवन व शहरातील पहिली आंतरराष्ट्रीय दर्जाची लायब्ररी आपल्या मोशीत साकारते आहे, हे सांगताना मला अभिमान वाटतो, असेही आमदार लांडगे म्हणाले आहेत.

#### आयआयएम शिक्षण क्षेत्रातील 'माईलस्टोन'...

आगामी काळात आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्यवस्थापन क्षेत्रातील शिक्षण उपलब्ध व्हावे. या करिता आयआयएम अर्थात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटची शाखा आपल्या भोसरी मतदार संघात होते आहे. कला क्षेत्राला प्रोत्साहन मिळावे म्हणून केंद्र सरकारच्या पुढाकाराने आपण राष्ट्रीय कला अकादमी उभारण्यासाठी पाठपुरावा करीत आहोत. यासह इंटरनॅशनल स्कील डेव्हलपमेंट सेंटर, सी-डॅक, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र असे विविध प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आम्ही प्रामाणिक प्रयत्न करीत आहोत, हे सर्व प्रकल्प शहराच्या शैक्षणिक क्षेत्राला नव्या उंचीवर नेतील, असा विश्वासही आमदार लांडगे यांनी व्यक्त केला.

---

## गुंतवणूक; ३५ हजार रोजगार निर्मिती

### इलेक्ट्रिक वाहन निर्मिती क्षेत्रामध्ये महाराष्ट्र अग्रेसर राज्य : शंकर जगताप

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठवाडा, विदर्भ, पुणे, पनवेल येथे १ लाख १७ हजार २२० कोटी रुपये गुंतवणुकीच्या ४ विशाल प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे. तसेच, जुलै महिन्यात ८० हजार कोटींच्या प्रकल्पांना मान्यता देण्यात आली असून, राज्यात दोन महिन्यात २ लाख कोटींची गुंतवणूक झाली आहे. या प्रकल्पांमुळे सुमारे ३५ हजार रोजगार निर्मिती होणार असल्याने, महाराष्ट्राची ओळख ही इलेक्ट्रिक वाहन निर्मिती क्षेत्रामध्ये अग्रेसर राज्य अशी होणार आहे, असे मत भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केले.**



> राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या दूरदृष्टी धोरणांमध्ये महाराष्ट्रात मोठी गुंतवणूक होत आहे. राज्यातील तरुणांच्या हाताला देखील प्रत्यक्ष – अप्रत्यक्षपणे काम मिळणार आहे. या प्रकल्पांमुळे तांत्रिक नवकल्पना, संशोधन आणि विकासाला चालना मिळून एक मजबूत स्थानिक पुरवठा साखळी विकसित होण्यास मदत होणार आहे.
>
> **–शंकर जगताप,** शहराध्यक्ष, भाजपा पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा)

टॉवर सेमीकंडक्टर कंपनीचा उच्च तंत्रज्ञानावर आधारित सेमीकंडक्टर निर्मितीचा अतिविशाल प्रकल्प पनवेल जि.रायगड येथे करण्यात येणार आहे. या प्रकल्पामध्ये पहिल्या टप्प्यात ५८ हजार ७६३ कोटी तर दुसऱ्या टप्यात रूपये २५ हजार १८४ कोटी अशी एकूण ८३ हजार ९४७ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. याप्रकल्पामुळे १५ हजार रोजगारनिर्मिती होणार आहे.

या प्रकल्पामध्ये एकूण १२ हजार कोटी एवढी गुंतवणूक होणार आहे. एक हजार रोजगार निर्मिती होणार आहे. प्रकल्पातून अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित इलेक्ट्रीक व्हेईकलचे निर्मिती केली जाणार आहे. टोयोटा किर्लोस्कर मोटर कंपनीचा प्रकल्प राज्याचे इलेक्ट्रीक वाहन प्रोत्साहन धोरणांतर्गत अतिविशाल प्रकल्प छत्रपती संभाजीनगर येथे सुरू करण्यात येणार आहे.

# विज्ञानाची साथ आणि विकासाची वाट...




**प्रयत्नवादाची कास धरण्यास प्रवृत्त करते ते विज्ञान. आजच्या वैज्ञानिक संशोधनांचा आधार घेऊन उद्याचे जीवन सुकर करते ते तंत्रज्ञान. यंत्रगतीचे विसावे शतक असो की तंत्रप्रगतीचे एकविसावे शतक, विज्ञान तंत्रज्ञानाचा पाया ज्या देशांनी भक्कम केला, त्यांनी शाश्वत विकासाची फळे लवकर चाखली.**

विज्ञान-तंत्रज्ञानाच्या आघाडीवर भारताने गेल्या दशकात लक्षणीय प्रगती साधली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, खगोलविज्ञान, अक्षय ऊर्जा, सेमी कंडक्टर, हवामान संशोधन, अवकाश संशोधन, जैवतंत्रज्ञान आदी क्षेत्रांवर आपण विशेष लक्ष केंद्रित केले आहे. मंगळयान, चांद्रयान-१, कोविड साथीच्या काळात कोविडची लस, डिजिटल स्टॅक किंवा ब्रह्मोस सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्राच्या स्वदेशी विकासासह विविध क्षेत्रांमध्ये भारताने केलेल्या मोठ्या प्रगतीचे जगभरात प्रचंड कौतुक झाले. जागतिक स्तरावर विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात भारताला अग्रस्थानी नेण्यासाठी सरकारने नुकतीच महत्त्वाची दोन धोरणे जाहीर केली. वैज्ञानिक आणि जैवतंत्रज्ञान उत्कृष्टतेच्या प्रवासातील मैलाचे दगड ठराव्यात अशा या योजना म्हणजे 'विज्ञान धारा' आणि 'बायो ई-३'. संशोधन, विकास आणि नाविन्यपूर्ण पायाभूत सुविधा निर्माण करून या योजनांच्या अंमलबजावणीसाठी सुमारे १०.५७९.८४ कोटी रुपयांची



तरतूद करण्यात आली आहे. विज्ञान धारा योजना विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधा वाढवण्यावर व विविध क्षेत्रांमध्ये इनोव्हेशन अर्थात नवोन्मेषास चालना देण्यावर लक्ष केंद्रित करते. तर बायो ई३ योजना, हवामान बदल, अन्न सुरक्षा आणि आरोग्य आव्हानांचा सामना करण्यासाठी बायोमॅन्युफॅक्चरिंग म्हणजेच जैव उत्पादनात क्रांती घडवून आणण्यासाठी सज्ज आहे. हे उपक्रम एकत्रितपणे आर्थिक आणि पर्यावरणीय पैलूंमध्ये समतोल राखण्यास मदत तर करतीलच पण त्याचबरोबर शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासातदेखील लक्षणीय योगदान देतील.या योजनेअंतर्गत मूलभूत संशोधन, शाश्वत ऊर्जा, पाणी यासारख्या अतिमहत्वाच्या क्षेत्रांमध्ये संशोधनाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला जात आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे क्षेत्र बळकट करून देशाच्या संशोधन व विकासाच्या पायाचा विस्तार करण्यासाठी मनुष्यबळ तयार करण्यातदेखील योगदान मिळेल. विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेषमध्ये महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. अगदी शालेय पातळीपासून ते उच्च शिक्षणापर्यंत सर्व स्तरांवर, नवकल्पनांना प्रोत्साहन देण्याच्या सरकारच्या प्रयत्नांना अधिक जोर मिळणार आहे. विज्ञान धारा अंतर्गत संशोधन उपक्रम तसेच नाविन्यपूर्ण प्रकल्पांसाठी निधी आणि अनुदान प्रदान करण्यात येणार आहे. औद्योगिक आणि शैक्षणिक संस्थांमधील संयुक्त संशोधन उपक्रम आणि सहयोगात्मक प्रकल्पांची अंमलबजावणी ही योजना करणार आहे. स्टार्ट-अप्स, उद्योजक आणि नवसंशोधकांसाठी विशेष नवोन्मेष केंद्रे देशभर स्थापन केली जातील. या योजनेमुळे जागतिक संशोधन संस्थांशी ज्ञानाची देवाणघेवाण आणि संयुक्त प्रकल्पांद्वारे आंतरराष्ट्रीय संशोधन सहकार्य सुलभ होणार आहे. तरुण संशोधकांची प्रतिभा विकसित करून क्षमता बांधणीच्या दृष्टीने त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी अनुभवी शास्त्रज्ञांशी जोडण्याचा उपक्रम हाती घेतला जाणार आहे. हवामान बदलामुळे होणाऱ्या विपरीत परिणामांची तीव्रता कमी करणे, अन्न सुरक्षा आणि मानवी आरोग्य यासारख्या काही गंभीर सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी, जीवशास्त्राच्या औद्योगिकीकरणात गुंतवणूक करण्याची आज नितांत गरज आहे. जैव-आधारित कच्चा माल वापरून प्रगत जैवतंत्रज्ञान प्रक्रियांद्वारे जैव-उत्पादननिर्मिती होते. बायो ई-३ योजनेचे उद्दिष्ट इकॉनॉमी, एन्व्हायर्नमेंट व एम्प्लॉयमेंट अर्थात अर्थव्यवस्था, पर्यावरण आणि रोजगार या प्रमुख क्षेत्रांमध्ये समतोल राखून भारताला जागतिक जैवतंत्रज्ञान शक्तिस्थानात रूपांतरित करणे हे आहे. त्यासाठी मजबूत जैव उत्पादन परिसंस्था उभारून नवकल्पनांद्वारे जैव-आधारित उत्पादने विकसित करणे ही संकल्पना आहे. जैवउत्पादन क्षेत्रांमध्ये संशोधन, विकास आणि उद्योजकता यांना नवोन्मेष-आधारित पाठबळ समाविष्ट आहे

## प्रासंगिक »

### वाद आणि दहशत

***आजच्या काळातला मोठा प्रश्न. भ्रष्टाचारविरोधी कायदे आहेत, महिलांची छेडछाड रोखू पाहणारे कायदे आहेत, ध्वनिप्रदूषण-बंदीचे कायदे आहेत.***

'पैसे घ्या पण काम करा', 'मुलीच उद्दीपक कपडे घालतात', 'आम्ही आनंदही साजरा करायचा नाही का' यांसारखी विधाने संबंधित कायद्यांच्या हेतूलाच हरताळ फासत असतात. कायदा आणि समाज यांतील अंतर यातून दिसत राहते. मात्र गोवंश हत्याबंदीचे गेल्या दशकभरात झालेले कायदे याला अपवाद. या कायद्यांची हिरिरीने अंमलबजावणी जिकडेतिकडे होताना दिसते. या अंमलबजावणीची पद्धत कोणतीही असली, त्यातून कितीही नुकसान झाले तरी बहुसंख्य समाज त्यास विरोध करत नाही. तरीसुद्धा, किंबहुना म्हणूनच- या कायद्यांच्या हेतूबद्दल वाद उपस्थित करण्याचा प्रयत्न थोडेफार विवेकीजन करत असतात. या विवेकीजनांचे हत्यार म्हणजे कुणालाही कुणाचा जीव घेण्याची मुभा गोरक्षणाचा कायदा देतो का, अशी शंका जाहीरपणे व्यक्त करणे.

पुण्यात कोणत्याही वेळेस, कोणत्याही वारी, कोणतीही गाडी चालवताना एकही अपशब्द तोंडातून आला नाही, असा प्रसंग आता नियमाला अपवाद म्हणूनही कधीच येत नाही! गेल्या २०-२५ वर्षांत सांस्कृतिक राजधानीचे झालेले स्खलन समजून घेण्यासाठी खरे तर हे एकच वाक्य पुरेसे आहे.

# पेन्शनरांच्या पुण्याचे हे असे काय झाले?

'इस अजनबीसे शहर में जाना-पहचाना ढूंढता है' ही गुलजारांच्या गीततली ओळ आपण प्रेम करीत असलेल्या शहराच्या अपकीर्तीची अधोरेखा होते, हे काळीज विदीर्ण करणारे आहे. यातील वेदना समजून घेण्यासाठी पुणे कधी काळी सुकीर्त ललाटरेषा मिरवत होते, याचे भान असायला हवे. पण, इथे अनेकांची तऱ्हा अशी, की हे भान व्यवस्थेला कृतीशील करण्यासाठी जाणिवेत रुजविण्यापेक्षा स्मरणरंजनात ओसंडून टाकण्यात धन्यता मानली जाते. 'आठवणीतले पुणे' वगैरे म्हणून टिपं गाळली, की झालं काम!या शहराचे जे काही वाट्टोळे होत आहे, त्याची खंत यात नसते असे नाही, पण त्यात प्रशासकीय व्यवस्था, राजकारणी यांच्याबरोबरच आपणही वेळीच काही न बोलून, काही कृती न करून किंवा काही कृती करायच्या न टाळून हातभार लावला आहे, हे असे 'स्मरणरंजनकार' विसरतात. लोक सिग्नल पाळत नाहीत, असे म्हणायचे आणि स्वत:ला मात्र रस्त्याच्या कडेच्या



भाजीवाल्याकडून भाजी घेताना मागची वाहने अडली, तरी भाजीवाल्यापाशीच गाडी उभी करून खरेदी करायचा 'हक्क' बहाल करायचा! लोक नियम पाळत नाहीत म्हणायचे आणि दुचाकीवरून जाताना हेल्मेट घालणे हा नियम असला, तरी तो मोडण्यात अधिक पुणेरीपणा कसा आहे, याचे समर्थन करत राहायचे! पदपथांवर अतिक्रमण होते म्हणायचे आणि ज्यांच्याकडून होते, त्यांच्याकडेच वस्तू स्वस्तात मिळतात, म्हणून सर्व काही खरेदी करत राहायचे! परदेशांत रस्त्यावर कचरा टाकला, की कसा दंड होतो, याचे किस्से ऐकवायचे आणि इथे मात्र कागदाच्या कपट्यापासून तोंडातून वाहणाऱ्या तंबाखू, माव्याच्या थुंक्यांना रस्त्यांवर प्रवाहित करायचे! सोयीस्कर विस्मरणाच्या अशा अनेक विसंगतींची आठवण या स्मरणरंजनकारांना करून द्यावी लागते. कारण, शहराच्या चांगल्या भविष्याचे स्वप्न पाहताना स्मरणाला दांभिकतेचा दर्प असून चालत नाही. पुण्याबद्दल बोलताना एक गोष्ट मान्य करायला हवी, की सायकलींचे, पेन्शनरांचे आणि शिक्षणाचे माहेरघर असलेले सुसंस्कृत व सुरक्षित पुणे आता रस्त्यांवर न मावणाऱ्या वाहनांचे, बकालपणाचे असे असंस्कृत आणि असुरक्षित शहर होत आहे. वाहतूक कोंडी ही तर या शहराला घुसमटवणारी अशी समस्या आहे, जी वेळीच आवरली नाही, तर ती या शहराचा गळा पुरता आवळेल. सुमारे ५० लाख लोकसंख्येच्या पुण्यात ३० लाखांहून अधिक खासगी वाहने आहेत. शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था काय लायकीची आहे, हे या संख्येवरून जसे स्पष्ट होते, तसे माणशी एक वाहन वापरायला लागल्यावर ते रस्त्यांच्या क्षमतेच्या पलीकडे कसे जाणार आहे, हाही संकेत यातून मिळतोच.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ‘खंडणी’वरुन राजकारण पेटले!

## राष्ट्रवादी-भाजपामध्ये जुंपली; पुरावा दाखवत शरद पवार गटाचे भाजपला प्रत्युत्तर

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**छत्रपती शिवाजी महाराजांनी सूरतेची लूट केली नव्हती. काँग्रेसने आपल्याला इतकी वर्षे चुकीचा इतिहास शिकवला, असे वक्तव्य उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले होते. त्यानंतर त्यावर अनेकांनी उहापोह केला. काहींनी इतिहासाचे दाखले दिले. तर भाजपाचे नेते नारायण राणे यांनी सूरतेची लूट झाली होती, असा घरचा आहेर दिला. यानंतर आता छत्रपती शिवाजी महाराजांनी खंडणी मागितली होती, असे विधान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केले आहे. या विधानावरून भाजपा आणि राष्ट्रवादीत सोशल मीडियावर जुंपली आहे.**



### सूरत लुटली हे म्हणणे चुकीचे

महाराजांनी त्यावर फुली मारली. तिथे जाऊ नका म्हणून सैनिकांना सांगितले. त्यांनी आधी सूरतला नोटीस पाठवून खंडणी मागितली होती. त्यानंतर सूरत लुटण्याचा निर्णय घेण्यात आला होता.दरम्यान याच वाहिनीवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुलाखत देताना सांगितले की, “छत्रपती शिवाजी महाराज हे मराठी माणूस, महाराष्ट्र आणि तमाम हिंदू समाजाचे आराध्य दैवत आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी सूरत लुटली हे म्हणणे चुकीचे आहे.

जयंत पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करताना म्हटले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी सूरत लुटली म्हणजे ते लुटारू होत नाहीत. नादीरशाहने सरसकट लूट केली होती. तसे महाराजांनी केले नाही. महाराजांनी यादी तयार केली. पारेख कुटुंबात कुणाचा तरी मृत्यू झाला होता, महाराजांनी त्यावर फुली मारली. तिथे जाऊ नका म्हणून सैनिकांना सांगितले. त्यांनी आधी सूरतला नोटीस पाठवून खंडणी मागितली होती. त्यानंतर सूरत लुटण्याचा निर्णय घेण्यात आला होता.दरम्यान याच वाहिनीवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुलाखत देताना सांगितले की, “छत्रपती शिवाजी महाराज हे मराठी माणूस, महाराष्ट्र आणि तमाम हिंदू समाजाचे आराध्य दैवत आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी सूरत लुटली हे म्हणणे चुकीचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी सूरतेवर दोनदा स्वारी केली. अल्लाउद्दीन खिलजी जे करतो त्याला लुट म्हणतात. अब्दाली, तैमूर यांनी जे केले त्याला लूट म्हणतात. महाराजांनी तिथल्या सामान्य माणसांना हात तरी लावला का? शिव इतिहासकारांनी माध्यमांना सांगितलं की महाराजांनी पत्र दिलं होतं मुघलांचा खजिना आहे, तुम्ही तीन वर्षे युद्ध चालवलं, त्यासाठी इतका खर्च आला. तुम्ही हा खर्च द्या अन्यथा मी स्वारी करेन. शिवरायांनी एक प्रकारे त्यांना नोटीसच पाठवली होती. खजिना वसूल केला, त्यानंतर महाराजांनी पावती दिली. याला लूट म्हणतात का? आपल्या बापाला लुटारू म्हणणारे हे कोण लोक आहेत? महाराजांनी कधीही सूरत लुटली नव्हती.दरम्यान जयंत पाटील यांच्या खंडणी शब्दावरून भाजपाने टीका केली आहे.

“महाराजांना कधी लुटारू तर कधी खंडणी मागणारे असं म्हणत महाविकास आघाडी कोणाला खुश करू पाहत आहे. खंडणी मिळाली नाही म्हणून सुरत लुटली हे म्हणायला जीभ कशी वळली?”, अशी पोस्ट भाजपा महाराष्ट्रने एक्सवर केली असून जयंत पाटील यांनी माफी मागावी, अशी मागणी करण्यात आली आहे.भाजपाच्या टीकेनंतर राष्ट्रवादीनेही ऐतिहासिक दाखला देऊन प्रतिवाद केला आहे. कृष्णाजी अर्जुन केळुसकर यांनी ‘छत्रपती शिवाजी महाराज’ या चरित्रलेखनात केलेल्या लेखनाचा हवाला देऊन खंडणी शब्द योग्य ठिकाणी वापरला असल्याचे प्रत्युत्तर दिले आहे.“होय… ‘खंडणीच’ शब्द. इतिहास काय सांगतो… छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अतुलनीय पराक्रमाचे विस्तृत वर्णन कृष्णाजी अर्जुन केळुसकर यांनी ‘छत्रपती शिवाजी महाराज’ या चरित्रलेखनातून केले आहे. या चरित्राची पहिली आवृत्ती ही १९०६ मध्ये प्रसिद्ध झाली. या चरित्राच्या भाग एकविसाव्यातील पान क्रमांक ३५५ वर ‘खंडणी’ या शब्दाचा उल्लेख आढळून येतो.

१६७० साली छत्रपती शिवाजी महाराजांनी दुस-यांदा सुरत लुटून पुन्हा स्वराज्याकडे मोर्चा वळवला, त्यावेळी त्या शहरातील रहिवाशांना उद्देशून महाराजांनी एक पत्र लिहिले, सदर पत्रात “तुम्ही प्रतिवर्षी बारा लाख रुपये ‘खंडणी’ बिनबोभाट पावती केल्यास तुमच्या शहरास पुनः लुटीची भीती उरणार नाही!” असा उल्लेख करण्यात आलेला आहे”, असे कॅप्शन या पोस्टसाठी लिहिण्यात आले आहे.

जयंत पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करताना म्हटले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी सूरत लुटली म्हणजे ते लुटारू होत नाहीत. नादीरशाहने सरसकट लूट केली होती. तसे महाराजांनी केले नाही. महाराजांनी यादी तयार केली. पारेख कुटुंबात कुणाचा तरी मृत्यू झाला होता

---

# पाथरपुंजला यंदा उच्चांकी ७,३१० मिलीमीटर पाऊस!

## महाराष्ट्रात पाच ठिकाणी सहा हजार मिलीमीटरहून अधिक पाऊस

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सातारा, सांगली व रत्नागिरी जिल्ह्यांच्या सीमेवरील पाथरपुंज (ता. पाटण) येथे यंदाच्या हंगामात तब्बल ७,३१० मिलीमीटर असा उच्चांकी पाऊस झाला आहे. यंदा पश्चिम महाराष्ट्रात आजवर पाथरपुंजबरोबरच वाळवण, नवजा, दाजीपूर व निवळे अशा पाच ठिकाणी सहा हजार मिलीमीटरहून अधिक पाऊस झाला आहे. तर महाबळेश्वरलाही यंदा ५९६२ मिलीमीटर पाऊस झाला आहे.**

राज्यातील पावसामध्ये ३० टक्क्यांहून अधिक वाढ झाल्याचे दिसत आहे.राज्याला दुष्काळाचा सामना करावा लागला होता. या पार्श्वभूमीवर यंदा झालेला हा जोरदार पाऊस लक्षणीय ठरला आहे. पाटण तालुक्यातील पाथरपुंजने यंदा सर्वाधिक पावसाचा विक्रम साधला आहे. यंदाचा पावसाळा सुरु झाल्यापासून आजवर पाथरपुंजला ७,३१० मिलीमीटर (२८७.७९ इंच) पावसाची नोंद झाली. आजही तिथे जोरदार पाऊस सुरूच आहे. त्यामुळे २०१९ साली पाथरपुंजने केलेला ९,९५६ मिलीमीटर (३९२ इंच) पावसाला आपला उच्चांक मागे टाकतो का? हे पहाणे यंदा कुतुहलाचे



### सर्वाधिक पावसाची ठिकाणे

.यंदा आजवर पश्चिम महाराष्ट्रातील सर्वाधिक पावसाची ठिकाणे असलेल्या पाथरपुंजला ७,३१० मिलीमीटर (२८७.७९ इंच) खालोखाल वाळवण (ता. महाबळेश्वर, जि. सातारा) ६,७३८ मिलीमीटर, कोयना पाणलोटातील नवजा (ता. पाटण, जि. सातारा) येथे ६,२५० मिलीमीटर, दाजीपूर (ता, राधानगरी, जि. कोल्हापूर) येथे ६,२०३ मिलीमीटर, निवळे (ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर) येथे ६,०२६ मिलीमीटर, कोयना पाणलोटातील महाबळेश्वर (ता. महाबळेश्वर, जि. सातारा) येथे ५,९६२ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे.

ठरणार आहे.सह्याद्रीच्या डोंगररांगांसह पश्चिम महाराष्ट्रात आजवर मान्सूनच्या पावसाचे सरासरीच्या एकतृतीयांशहून अधिकचे प्रमाण राहिले आहे. त्यात विशेषतः पश्चिम घाटमाथ्यावर सतत जोरदार पाऊस झाला आहे. अलीकडे याच प्रदेशातील पाथरपुंज हे ‘महाराष्ट्राची चेरापुंजी’ म्हणून लौकिकास आले चांदोली धरणाला मिळते. गेल्या चार- पाच वर्षात गतवर्षीचा अपवाद वगळता पाथरपुंज परिसरातच सर्वाधिक पाऊस होत आहे. सन २०१९ च्या पावसाळ्यात पाथरपुंजने देशात सर्वाधिक पाऊस होणाऱ्या मेघालय चेरापुंजीला मागे टाकले. त्यावेळी पाथरपुंजला एकूण ९,९५६ मिलीमीटर पावसाची नोंद झाल्याने स्वाभाविकपणे पाथरपुंज हे चेरापुंजीची बरोबर करणारे ठिकाण म्हणून चर्चेत राहिले.

# आम्ही फाशीला मान्यता दिली नसती

## अफझल गुरुच्या फाशीबाबत अब्दुल्ला यांचे धक्कादायक विधान

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**२००१ साली संसदेवर झालेल्या हल्ल्यातील आरोपी अफझल गुरूच्या फाशीबाबत नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे नेते ओमर अब्दुल्ला यांनी वादग्रस्त विधान केले आहे. अफझल गुरूला फाशी देऊन काहीच साध्य झाले नाही. जम्मू-काश्मीरच्या हातात असते तर आम्ही या फाशीला कधीही मान्यता दिली नसती, असे धक्कादायक विधान ओमर अब्दुल्ला यांनी केले आहे. यामुळे आता वाद उद्भवण्याची शक्यता आहे. जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभेची निवडणूक होत आहे. त्या पार्श्वभूमीवर आता हा मुद्दा आता चर्चेत आला आहे.**



### त्याच्यावर तिहार तुरुंगातच अंत्यसंस्कार

जवळपास ३० मिनिटे गोळीबार सुरू होता. या चकमकीत पाचही दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला. दहशतवाद्यांच्या गोळीबारात नऊ लोक शहीद झाले. त्यामध्ये दिल्ली पोलिस दलातील पाच जणांचा समावेश होता. केंद्रीय राखीव पोलिस दलातील एक महिला, संसदेतील दोन कर्मचारी आणि एका पत्रकाराचा समावेश होता. या घटनेनंतर पोलिसांनी काही तासांतच या हल्ल्याचा मुख्य सूत्रधार अफजल गुरूला अटक करण्यात आली होती. याआधी अफजल गुरुने राष्ट्रपतींकडे दयेचा अर्ज सादर केला होता. मात्र तत्कालीन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी हा दयेचा अर्ज फेटाळून लावला. त्यानंतर त्याला फाशी देण्यात आली. त्याच्यावर तिहार तुरुंगातच अंत्यसंस्कार करण्यात आले होते.

एएनआय वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीमध्ये ओमर अब्दुल्ला म्हणाले की, जम्मू आणि काश्मीर सरकारचा आणि अफझल गुरूच्या फाशीचा काहीही संबंध नव्हता. इतरवेळी फाशी देताना त्या त्या राज्य सरकारची परवानगी घेतली जाते. अफझल गुरूला फाशी देऊन कोणताही हेतू साध्य झालेला नाही.आपल्या भूमिकेचे समर्थन करताना ओमर अब्दुल्ला म्हणाले की, मी मृत्यूदंडाच्या शिक्षेच्याच विरोधात आहे. तसेच मी न्यायालयाच्या अयोग्यतेवर विश्वास ठेवत नाही. तसेच भारत किंवा भारताबाहेरील देशांमधील पुराव्यांनी हे वेळोवेळी दाखवून दिले आहे की, एखाद्या व्यक्तीला फाशी दिल्यानंतर आपण चुकीचे होतो, हे सिद्ध झालेले आहे. ओमर अब्दुल्ला यांच्या विधानावर प्रतिक्रिया देताना भाजपाचे नेते साजीद युसुफ म्हणाले की, जम्मू आणि काश्मीरच्या लोकांना न्याय देण्याच्या दृष्टीने अफझल गुरूला फाशी देणे गरजेचे होते.तर नॅशनल कॉन्फरन्सशी आघाडी करून जम्मू-काश्मीरमध्ये निवडणूक लढविणाऱ्या काँग्रेस पक्षाने मात्र ओमर अब्दुल्ला यांच्या विधानावरून स्वतःला बाजूला करत अंतर राखले आहे. काँग्रेसचे नेते सलमान खुर्शीद म्हणाले की, या विषयाची आपण आता का चर्चा करत आहोत? ही निवडणुकीची वेळ आहे. नेते प्रतिक्रिया देत असतात. पण मला यावर भाष्य करण्यासारखे काही वाटत नाही.जम्मू काश्मीरमध्ये तीन टप्प्यांत मतदान होणार आहे. १८ सप्टेंबरला पहिला टप्पा, २५ सप्टेंबरला दुसरा टप्पा, तर १ ऑक्टोबरला तिसरा टप्पा होणार आहे. तर ८ ऑक्टोबर रोजी हरियाणा विधानसभेसह निवडणुकीचा निकाल जाहीर होईल.१३ डिसेंबर २००१ रोजी सकाळी ११.४० वाजता पाच दहशतवादी जुन्या संसदेच्या आवारात घुसले. गृहमंत्र्यांचा स्टिकर लावलेल्या गाडीमध्ये हे पाचही जण संसदेच्या आवारात आले. पण सुरक्षा रक्षकांना सदर गाडीबाबत संशय आल्यानंतर गाडीला मागे जाण्यास सांगितले गेले. यामुळे दहशतवाद्यांनी गाडीतून बाहेर पडत अंदाधुंद गोळीबार करण्यास सुरुवात केली. यामुळे संसदेचा आपत्कालीन अलार्म वाजविला गेला आणि संसद सभागृहात जाणारे सर्व दरवाजे बंद करण्यात आले. त्यावेळी संसदेत शंभरहून अधिक खासदार, मंत्री उपस्थित होते. जवळपास ३० मिनिटे गोळीबार सुरू होता. या चकमकीत पाचही दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला. दहशतवाद्यांच्या गोळीबारात नऊ लोक शहीद झाले. त्यामध्ये दिल्ली पोलिस दलातील पाच जणांचा समावेश होता. केंद्रीय राखीव पोलिस दलातील एक महिला, संसदेतील दोन कर्मचारी आणि एका पत्रकाराचा समावेश होता. या घटनेनंतर पोलिसांनी काही तासांतच या हल्ल्याचा मुख्य सूत्रधार अफजल गुरूला अटक करण्यात आली होती. २६ सप्टेंबर २००६ रोजी सर्वोच्च न्यायालयाने अफजल गुरुला फाशी देण्याचा आदेश दिला होता. न्यायालयाच्या आदेशानंतर ९ फेब्रुवारी २०१३ साली त्याला फाशी देण्यात आली. याआधी अफजल गुरुने राष्ट्रपतींकडे दयेचा अर्ज सादर केला होता. मात्र तत्कालीन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी हा दयेचा अर्ज फेटाळून लावला. त्यानंतर त्याला फाशी देण्यात आली. त्याच्यावर तिहार तुरुंगातच अंत्यसंस्कार करण्यात आले होते.

# उज्जैनमधील बलात्कार मानवतेला कलंक

## उज्जैन बलात्कार : राहुल गांधी, प्रियांका गांधींनी व्यक्त केला संताप

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**मध्य प्रदेशच्या उज्जैन शहरातील आगर नाका भागात एक संतापजनक घटना घडली आहे. येथे एका कचरा व भंगार वेचणाऱ्या महिलेला जबरदस्तीने मद्यप्राशन करायला लावून तिच्यावर बलात्कार केल्याची घटना समोर आली आहे. बुधवारी (४ सप्टेंबर) सदर घृणास्पद घटना घडली. दरम्यान, आरोपी नराधम महिलेबरोबर दुष्कर्म करत असताना रस्त्यावरून अनेक लोक ये-जा करत होते.**



### तिच्या कुटुंबियांसाठी क्लेशदायी

उज्जैनच्या पवित्र भूमिक घडलेल्या या घटनेने मानवतेला काळिमा फासला गेला आहे.लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही या घटनेचा निषेध केला. तसेच त्यांनी उत्तर प्रदेशच्या सिद्धार्थ नगर येथे घडलेल्या महिला अत्याचार प्रकरणाचाही दाखला देऊन एकूणच महिलांच्या सुरक्षेचा गंभीर मुद्दा उपस्थित केला. एक्स पोस्टमध्ये ते म्हणाले, "उज्जैन आणि सिद्धार्थ नगरमध्ये घडलेली घटना मानवतेला काळिमा फासणारी आहे. महिलांच्या विरोधात वाढत चाललेल्या अत्याचाराच्या घटना आणि त्यावर पोलिसांकडून होणारी ढिलाई ही पीडिता आणि तिच्या कुटुंबियांसाठी फारच क्लेशदायी असते.

महिलेला वाचवण्याऐवजी बलात्काराचा व्हिडीओ चित्रीत करत होते. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर सदर प्रकरण उजेडात आले. आता या प्रकरणी राजकारण पेटले असून लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि सरचिटणीस प्रियांका गांधी यांनी संताप व्यक्त केला आहे.प्रियांका गांधी यांनी एक्सवर पोस्ट करत आपला संताप व्यक्त केला."मध्य प्रदेशच्या उज्जैनमध्ये दिवसा ढवळ्या पथपथावर एका महिलेवर अत्याचार झाले. ही घटना अत्यंत भयावह आहे. आपला समाज कोणत्या दिशेने चालला आहे, हे पाहून संपूर्ण देश सुन्न पडला आहे. माध्यमात आलेल्या बातम्यानुसार रस्त्यावरून जाणारे लोक या घटनेचे चित्रीकरण करण्यात व्यस्त होते.

**हिंदू धर्मात गणेशाला बुद्धीची, ज्ञानाची देवता मानतात. सर्व शुभ कार्यात प्रथम गणपतीची पूजा करतात. कारण तो सुखकर्ता, दुःखहर्ता, विघ्नहर्ता आहे. या गणेश चतुर्थीचा इतिहास, आपण गणेश चतुर्थी का साजरी करतो? याचे महत्त्व, त्याचप्रमाणे गणेश चतुर्थी कशाप्रकारे साजरी केली जाते? याबाबतची सगळी माहिती महाईन्यूजच्या माध्यमातून आपल्यापर्यंत घेऊन आलो आहोत.**

## गणेश चतुर्थीचा इतिहास

» स्कंदपुराण, नारद पुराण, त्याचप्रमाणे याज्ञवल्क्य स्मृती, महाभारत यांसारख्या ग्रंथांमध्ये गणपतीचा उल्लेख आढळून येतो. पाचव्या आणि आठव्या शतकामध्ये एलोरा लेण्यांसारख्या हिंदू, बौद्ध, जैन मंदिरांमध्ये केलेल्या कोरीव कामांमध्ये गणेशाच्या मूर्ती विराजमान असल्याचे दिसून येते. गणेश चतुर्थीचा उगम हा प्राचीन काळापासून आहे. परंतु सतराव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात या गणेश चतुर्थीला महत्त्व प्राप्त झाले.

## चतुर्थीला चंद्र का बघू नये ?


» गणेश चतुर्थीच्या दिवशी रात्री चंद्र दर्शन करू नये. यासाठी फार पूर्वीपासून एक कथा सांगितली जाते. एके दिवशी आपले लाडके बाप्पा श्री गणेश मूषकावर बसून मोठ्या लगबगिने कुठेतरी जात होते. तेव्हा त्या गडबडीत असताना ते घसरले आणि पडले. त्यांना पडलेले पाहून चंद्र जोरात हसू लागला. त्यामुळे गणपती बाप्पाला राग आला. आणि त्याने चंद्राला शाप दिला. बाप्पा म्हणाला, आजपासून तुझं तोंड कोणीही पाहणार नाही. जो तुझे तोंड पाहिलं, त्याच्यावर चोरीचा खोटा आळ येईल. गणपती बाप्पाच्या या बोलण्यामुळे चंद्र मात्र चांगलाच घाबरला आणि गणपती बाप्पाला प्रसन्न करून घेण्यासाठी त्यांनी मोठमोठे तप सुरू केले.

## हरतालिका पूजा व्रतकथा

» चंद्राच्या या भक्तीने गणपती बाप्पा देखील प्रसन्न झाले. आणि त्यांनी चंद्राला उ:शाप दिला की, फक्त गणेश चतुर्थीच्या दिवशी तुझा तोंड कोणीही पाहणार नाही. त्यानंतर चंद्राने गणपती बाप्पाकडे विनंती केली की, जर एखाद्याने चुकून त्या दिवशी माझे दर्शन घेतले तर त्यांनी काय करावे माझ्या चुकीची शिक्षा एखाद्या निष्पाप व्यक्तीला व्हायला नको. यावर बाप्पाने सांगितले की, संकष्टी चतुर्थी व्रत केल्यास त्या व्यक्तीची खोट्या आळातून मुक्तता होईल. म्हणून या दिवशी कोणीही चंद्र दर्शन करत नाही.

## गणेश चतुर्थी का महत्वाची आहे ?

» हिंदू कॅलेंडरमधील एक महत्त्वाचा सण म्हणून गणेश चतुर्थीला पाहिले जाते. हा उत्सव संपूर्ण भारतभर मोठ्या उत्साहाने भक्तीने आनंदाने साजरा केला जातो. या सणाला अनेक कारणांमुळे महत्त्व प्राप्त होते. हा सण भारतीय संस्कृती, वारसा आणि विविधतेचा उत्सव आहे. त्यामुळे सांस्कृतिकदृष्ट्या, सामाजिक दृष्ट्या, पर्यावरणाच्यादृष्टीने आणि मुख्यतः आर्थिकदृष्टीने हा सण महत्त्वाचा समजला जातो.



**1** गणेश चतुर्थी ही काही ठिकाणी दीड दिवस, पाच दिवस, सात दिवस, दहा दिवस अशाप्रकारे साजरी केली जाते. संपूर्ण भारतामध्ये, त्याचप्रमाणे परदेशातही ज्या ठिकाणी भारतीय राहतात त्याठिकाणी मोठ्या आवडीने हा सण साजरा केला जातो. सामाजिक एकोपा राहण्यासाठी लोकमान्य टिळकांनी गणेश चतुर्थीच्या दिवशी सर्व घरांमध्ये आणि त्याचप्रमाणे सार्वजनिक ठिकाणी श्री गणेशाच्या मूर्तीची स्थापना केली. हा गणेशोत्सव भाद्रपद महिन्यामध्ये दरवर्षी साजरा केला जातो. त्यासाठी मोठ्या मोठ्या शहरांमध्ये ठिकठिकाणी गणेश मंडळांची स्थापना केली जाते. सार्वजनिक गणेशोत्सवामध्ये देखील दररोज सकाळी आणि संध्याकाळी गणेशाची पूजा आणि आरती केली जाते. तसेच नैवेद्य दाखवून प्रसादाचे देखील वाटप करण्यात येते. या उत्सव प्रसंगी अनेक गणेश मंडळामध्ये विविध प्रकारच्या स्पर्धा घेतल्या जातात. तसेच या सार्वजनिक गणेशोत्सवाचे देखावे पाहण्यासाठी लोकांची गर्दी जमलेली पहावयास मिळते. या निमित्ताने समाजातील लोक एकत्र येतात आणि आपल्यातील मतभेद दूर करून हा सण उत्साहाने आणि आनंदाने साजरा करतात.

**2** आपला भारत देश हा संस्कृती धार्मिक परंपरा जपणारा देश आहे. या देशांमध्ये साजरे होणारे प्रत्येक सण, उत्सव मोठ्या उत्साहाने आनंदाने आणि एकत्र येऊन साजरे केले जातात. गणेश चतुर्थी हा भारतातील एक महत्त्वाचा असा सण आहे, जो विविधता आणि सांस्कृतिक वारसाचे प्रतिनिधित्व करतो. संपूर्ण देशभरात विशेष करून महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तामिळनाडू यांसारख्या राज्यांमध्ये हा सण मोठ्या उत्साहात, आनंदात साजरा केला जातो. या उत्सवामुळे लोकांना एकत्र येण्यासाठी, त्याचप्रमाणे परंपरा साजरी करण्यासाठी, तसेच सांस्कृतिक पद्धत अवलंबण्यासाठी एक व्यासपीठ मिळते.

**3** या उत्सवाच्या शेवटच्या दिवशी श्री गणेशाच्या मूर्तीचे विसर्जन पाण्यामध्ये करण्यात येते. परंतु गेल्या काही वर्षांमध्ये पाण्यामध्ये न विरघळणाऱ्या पदार्थांचा वापर करून गणपतीच्या मूर्ती केल्या जातात. यामुळे पर्यावरणावर त्याचा विपरीत परिणाम घडून येत आहे. याला आळा घालण्यासाठी, पर्यावरणाचे महत्त्व लक्षात घेऊन तसेच पर्यावरण पूरक उत्सवांना चालना देण्यासाठी अनेक संस्था कार्यरत आहेत. त्यामुळे नैसर्गिक साहित्यापासून म्हणजेच माती, कागद यापासून बनवलेल्या गणेशाच्या मूर्ती उदयास येत आहे. यामुळे या मूर्तींचे पाण्यामध्ये विघटन होऊन पर्यावरणातील कुठल्याही जीवांना हानी होत नाही.

**4** गणेशोत्सवाला ज्याप्रमाणे संस्कृती, सामाजिक आणि पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्व आहे, त्याचप्रमाणे आर्थिक दृष्ट्या सुद्धा महत्त्व आहे. हा सण साजरा करण्यासाठी सणाला लागणाऱ्या सजावटीच्या, मिठाईच्या तसेच खाण्याच्या वस्तू खरेदी करण्यासाठी लोक बाजारपेठेमध्ये येत असतात. त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. येथील कारागीर, सजावटकार, व्यापारी लोकांना यामुळे रोजगार निर्माण होतो. पुराण कथेनुसार माता-पार्वतीचा पुत्र भगवान गणेश याचा जन्म भाद्रपद चतुर्थीला झाला होता. म्हणून आपण गणेश चतुर्थी हा सण साजरा करतो. भगवान शंकर आणि पार्वती पुत्र गणपती बुद्धीची देवता आहे. हिंदू धर्मात भगवान श्री गणेशाला प्रथम पूजेचा मान असतो. कोणत्याही

# वेलकम बाप्पा!

पार्वती देवीला स्नानासाठी जावयाचे होते. पण आसपास लक्ष ठेवण्याकरता कोणीच नव्हते. तेव्हा पार्वती देवीने आपल्या अंगावरील मळाने एक मूर्ती बनवली आणि ती जिवंत केली. या मूर्तीला पहारेकरी नेमलं आणि सांगितलं की, कोणालाही आतमध्ये येऊ देऊ नकोस. असे सांगून पार्वतीमाता स्नानासाठी आत गेली. भगवान शंकर काही वेळाने तिथे आले आणि ते आत जाऊ लागले. तोच त्या पहारेकऱ्याने त्यांना अडवले. त्यावर भगवान शंकर संतप्त झाले आणि त्यांनी त्या पहारेकऱ्याचं शिर धडावेगळं केलं. पार्वतीदेवी जेव्हा स्नान करून बाहेर आली तेव्हा त्यांनी हा प्रकार पाहिला आणि त्या संतापल्या. ते धडावेगळं शिर पाहून तिने पूर्ण ब्रम्हांड हादरवून सोडलं. सर्व देव अगदी ब्रम्हदेवापासून सगळे देव पार्वतीची समजूत घालण्याचा प्रयत्न करतात. पण पार्वती कोणाचं काहीही ऐकून घेत नाही. तेव्हा शंकर देव आपल्या गणाला आदेश देतात की, पृथ्वीतलावर जाऊन सर्वात आधी जो प्राणी दिसेल त्याचं शिर कापून घेऊन ये. गण बाहेर पडल्यावर सर्वात आधी त्याला हत्ती दिसला. तो त्याचं शिर घेऊन आला. भगवान शंकरांनी ते शिर पुतळ्याला लावले आणि त्या मूर्तीला जिवंत केले. हा पार्वतीचा मानस पुत्र गज (हत्ती) आनन (मुख) म्हणजेच गजानन होय. शंकर देवाने त्याला गणाचा ईश म्हणेज देव म्हणून गणेश नाव ठेवलं. हा दिवस चतुर्थीचा होता. त्यामुळे चतुर्थीला गणेश चतुर्थी म्हणून महत्त्व आहे. त्यामुळे तुम्हाला गणेश चतुर्थी ची माहिती मराठीत असणं आवश्यक आहे.



# प्रवीण कुमारने पटकावले सुवर्णपदक!

## पुरुषांच्या उंच उडीत सुवर्ण जिंकणारा दुसरा भारतीय

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारतीय पॅरा ॲथलीट प्रवीण कुमारने पॅरिस पॅरालिम्पिकच्या पुरुषांच्या उंच उडी T64 स्पर्धेत आशियाई विक्रम मोडून सुवर्णपदक जिंकले. लहान पायांसह जन्मलेल्या प्रवीणने सहा खेळाडूंमध्ये हंगामातील सर्वोत्तम २.०८ मीटर उडी मारली आणि अव्वल स्थान पटकावले. भारताचे हे एकूण २६ वे पदक आहे, तर हे सहावे सुवर्ण आहे. भारताच्या खात्यात आतापर्यंत नऊ रौप्य आणि ११ कांस्यपदक आली आहेत. प्रवीणचे पॅरालिम्पिकमधील हे सलग दुसरे पदक आहे. यापूर्वी, त्याने टोकियो पॅरालिम्पिकमध्ये २.०७ मीटरच्या सर्वोत्तम प्रयत्नाने रौप्य पदक जिंकले होते.**




उत्तर प्रदेशातील नोएडा येथील प्रवीण मरियप्पन (२१) हा पॅरालिम्पिकमध्ये पुरुषांच्या उंच उडीत सुवर्णपदक जिंकणारा थंगावेलू नंतरचा दुसरा भारतीय पॅरा ॲथलीट आहे. अमेरिकेच्या डेरेक लॉसेंटने २.०६ मीटरच्या उडीसह रौप्यपदक तर उझबेकिस्तानच्या टेमेरबेक झियाझोव्हने २.०३ मीटरच्या उडीसह कांस्यपदक जिंकले. या कामगिरीसह प्रवीण कुमार पॅरिसमध्ये पदक जिंकणारा तिसरा भारतीय उंच उडीपटू ठरला. त्याच्या आधी शरद कुमारने रौप्यपदक जिंकले होते, तर मरियप्पनने पुरुषांच्या T63 स्पर्धेत कांस्यपदक जिंकले होते.T64 मध्ये अशा खेळाडूंचा समावेश होतो, ज्यांच्या एका पायाच्या खालच्या भागात हलकी ते मध्यम हालचाल असते. तसेच एक किंवा दोन्ही पाय गुडघ्याच्या खाली नसतात.पॅरालिम्पिक स्पर्धेत भारताने आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी केली आहे. टोकियो पॅरालिम्पिक २०20 मध्ये भारताने ५ सुवर्ण, ८ रौप्य आणि ६ कांस्य पदके अशी एकूण १९ पदकांसह ही भारताची पॅरालिम्पिक स्पर्धेतील सर्वोत्तम कामगिरी ठरली होती. यावेळच्या पॅरालिम्पिकमध्ये जिथे भारताने आतापर्यंत २६ पदके जिंकण्यात यश मिळवले आहे. अवनी लखेरा, नितेश कुमार, सुमित अंतिल, हरविंदर सिंग, धरमबीर आणि प्रवीण कुमार यांनी पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारतासाठी सुवर्णपदके जिंकली आहेत. पॅरा ॲथलीट मुरलीकांत पेटकर याने १९७२ मध्ये पॅरालिम्पिक स्पर्धेत भारताला पहिले पदक मिळवून दिले होते. मुरलीकांत पेटकर हे तेच खेळाडू आहे, ज्यांच्या जीवनावर 'चंदू चॅम्पियन' हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला होता.भारताचा पॅरा ज्युडोपटू कपिल परमारने चमकदार कामगिरी करत कांस्यपदक पटकावले. कपिलने पुरुषांच्या ६० किलो वजनी गटाच्या J1 स्पर्धेच्या कांस्यपदकाच्या लढतीत ब्राझीलच्या एलिटॉन डी ऑलिव्हेराचा पराभव केला. त्याने एलिटॉन १०-० असा पराभव करत कांस्य मिळवण्यात यश मिळवले. यासह कपिलने इतिहासही घडवला आहे. कारण पॅरालिम्पिक किंवा ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकणारा तो भारतातील पहिला ज्युडोपटू ठरला आहे. त्यामुळे पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारताच्या पदकांची संख्या २५ पोहोचली आहे. यानंतर पंतप्रधान मोदींनी कपिल परमारच्या कामगिरीचे कौतुक केले.पीएम मोदींनी त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर कपिल परमारच्या कामगिरीबद्दल त्यांचे कौतुक केले. पोस्टमध्ये पंतप्रधानांनी लिहिले, "एक अतिशय संस्मरणीय खेळातील कामगिरी आणि एक विशेष पदक. कपिल परमार पॅरालिम्पिक स्पर्धेतील ज्युडोमध्ये पदक जिंकणारा पहिला भारतीय ठरल्याबद्दल त्याचे खूप खूप अभिनंदन. पॅरालिम्पिक २०२४ मधील पुरुषांच्या ६० किलो (जे1) वजनी गटात देशासाठी दमदार कामगिरी करत ज्युडोमध्ये कास्य पदक जिंकल्याबद्दल कपिल परमारचे अभिनंदन आणि त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!प्रत्येकी एक पिवळे कार्ड मिळाले. कपिलला सुवर्णपदक मिळवून देता आले नसले तरी कांस्यपदक जिंकण्यात तो यशस्वी ठरला. जे खेळाडू अंध आहेत किंवा कमी दृष्टी आहेत ते पॅरा ज्युडोमध्ये J1 श्रेणीत सहभागी होतात.भारतीय पॅरालिम्पिक समितीने या स्पर्धेपूर्वी किमान २५ पदके जिंकण्याची अपेक्षा व्यक्त केली होती आणि हे लक्ष्य साध्य झाले आहे. यामुळे येथील पॅरा खेळाडूंची कामगिरी अपेक्षेपेक्षा जास्त असेल. मात्र, सुवर्णपदक जिंकण्याचा दुहेरी आकडा गाठण्याची अपेक्षा पूर्ण होऊ शकली नाही. पॅरिस गेम्समध्ये भारताने आतापर्यंत पाच सुवर्ण, नऊ रौप्य आणि ११ कांस्यपदके जिंकली आहेत.

### परमारने पटकावले कांस्यपदक

कपिल परमार हा मध्य प्रदेशातील शिवोर नावाच्या छोट्या गावातील रहिवासी आहे. परमारचा लहानपणी अपघात झाला होता. गावातील शेतात खेळत असताना चुकून त्याचा पाण्याच्या विद्युत पंपाला स्पर्श झाला. त्यामुळे त्याला विजेचा जोरदार धक्का बसला. यानंतर बेशुद्ध झालेल्या परमारला रुग्णालयात नेण्यात आले आणि सहा महिने तो कोमात राहिलापोस्टमध्ये पंतप्रधानांनी लिहिले, "एक अतिशय संस्मरणीय खेळातील कामगिरी आणि एक विशेष पदक. कपिल परमार पॅरालिम्पिक स्पर्धेतील ज्युडोमध्ये पदक जिंकणारा पहिला भारतीय ठरल्याबद्दल त्याचे खूप खूप अभिनंदन.

# जोश इंगलिसने ४३ चेंडूत झळकावले शतक

## षटकार-चौकारांसह केल्या 70 धावा, मोडला फिंचचा विक्रम

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**ऑस्ट्रेलियाचा स्फोटक यष्टीरक्षक-फलंदाज जोश इंगलिसने स्कॉटलंडविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात अवघ्या ४३ चेंडूत शतक झळकावले. यासह, तो आंतरराष्ट्रीय टी-२० मध्ये ऑस्ट्रेलियासाठी सर्वात जलद शतक झळकावणारा फलंदाज बनला. त्याने ॲरॉन फिंच आणि ग्लेन मॅक्सवेल यांचा विक्रम मोडला, ज्यांनी प्रत्येकी ४७ चेंडूत शतके झळकावली होती.**



इंगलिसचे टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील हे दुसरे शतक आहे. आता त्याने टी-२० इंटरनॅशनलमध्ये दोन किंवा अधिक शतके झळकावणाऱ्या फिंच आणि मॅक्सवेलच्या यादीत स्थान मिळवले आहे. शुक्रवारी ६ सप्टेंबर रोजी एडिनबर्ग येथे झालेल्या दुसऱ्या टी-२० सामन्यात ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी केली. गेल्या सामन्यातील स्टार सलामीवीर ट्रॅव्हिस हेड दुसऱ्याच षटकात खाते न उघडता बाद झाला, तर दुसरा युवा सलामीवीर जेक फ्रेझर मॅकगर्क हाही चौथ्याच षटकात पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर आलेल्या यष्टिरक्षक-फलंदाज जोश इंगलिसने फार वेळ न घालवता जबाबदारी स्वीकारली आणि आक्रमण सुरु केले. यादरम्यान इंगलिसने अवघ्या २० चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले.यानंतरही इंगलिसने आक्रमण सुरूच ठेवले आणि कॅमेरून ग्रीनसह डाव पुढे नेला. त्यानंतर ग्रीन बाद झाल्यानंतरही इंगलिस थांबला नाही आणि १८व्या षटकात आपले शतक पूर्ण केले. त्याने सलग २ षटकारांसह अवघ्या ४३ चेंडूत दुसरे टी-२० आंतरराष्ट्रीय शतक पूर्ण केग्लेन मॅक्सवेल यांचा ऑस्ट्रेलियासाठी सर्वात जलद शतकाचा विक्रम मोडला.

### कारकिर्दीतील दुसरे शतक

अखेर १९व्या षटकात इंगलिस बाद झाला. त्याने अवघ्या ४९ चेंडूत १०३ धावा केल्या, त्यापैकी ७० धावा ७ चौकार आणि ७ षटकारांच्या मदतीने केल्या. इंगलिसच्या टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील हे दुसरे शतक होते. यापूर्वी त्याने नोव्हेंबर २०२३ मध्ये विशाखापट्टणम येथे भारताविरुद्ध ११० धावांची इनिंग खेळली होती. आंतरराष्ट्रीय टी-२० मध्ये २ किंवा अधिक शतके झळकावणारा तो केवळ तिसरा ऑस्ट्रेलियन फलंदाज आहे.